**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धीपत्रक**

# विद्यार्थी-शिक्षक यांच्या विकासासाठी एक नवी दिशा — 'अपनी शाळा फाउंडेशन' मार्फत प्रभावी प्रशिक्षण शिबिर

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मनपा शाळेतील विद्यार्थांची आर्थिक आणि भावनिक परिस्थिती सारखी नसते.काही कुटुंबातील आईवडील दोन्ही कामावर जातात. हातावर पोट असलेल्या हे पालक मग आपल्या मुलांचे भविष्य उज्वल करण्यासाठी मनपा शाळेत दाखल करतात.घरच्या गरिबीमुळे असलेले भावनिक क्षण आणि मानसिक स्थिती यांचा विकास होणे खऱ्या अर्थाने गरजेचे आहे.याचा सखोल विचार करून मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ.शर्मा (भा.प्र.से) यांनी दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी शाळा क्रमांक ३२ येथे सेंटर ऑफ एक्सलन्स सहकार्याने एक मार्गदर्शन प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते. या प्रशिक्षणाचा प्रमुख उद्देश शिक्षकांना सामाजिक व भावनिक अध्ययन (Social and Emotional Learning - SEL) या विषयात सशक्त करणे हा होता. या प्रशिक्षणाचे संचालन अपनी शाळा फाउंडेशनच्या सौ. मयुरी गोलंबडे यांनी उत्तमरित्या केले. शाळा क्रमांक ४, १४ आणि ३२ मधील एकूण १६ शिक्षकांनी या शिबिरात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजा समजून घेत सकारात्मक संवाद साधण्याच्या विविध तंत्रांची माहिती देण्यात आली.

➢ शिबिरात खालील मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली:

- विद्यार्थ्यांच्या भावनिक मनस्थितीचे आकलन व जतन
- आत्मचिंतन व सहवेदना (Empathy) जोपासण्याचे महत्त्व
- प्रभावी संवाद व भावनिक परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य
- वैयक्तिक आणि एकत्रित येऊन विविध उपक्रमात सहभाग वाढविण्याचे उपाय

प्रश्नोत्तर सत्रात शिक्षकांनी मनमोकळेपणाने विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे मिळाली. त्यामुळे प्रशिक्षण अधिक संवादात्मक व समृद्ध झाले. या प्रशिक्षणानंतर शिक्षकांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की (Social and Emotional Learning ) SEL या विषयावर आमचे ज्ञान वाढले असून, आम्ही आता विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजांकडे अधिक सजगतेने पाहू शकतो." माननीय आयुक्तांनी या पुढील काळात अशा उपक्रमांचे सातत्य राखून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.